# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक ०७/१२/२०१७

## <u>*दोन जहाल माओवादयांचे आत्मसमर्पन*</u>

- <u>*गडचिरोली पोलीसांचा माओवादयांना जबर दणका*</u>

पी.एल.जी. सप्ताह चालु असताना कालच्या ऐतिहासिक कामगिरी नंतर गडचिरोली पोलीसांच्या हाती आणखी एक मोठे यश प्राप्त झाले आहे. आज दिनांक ०७/११/२०१७ रोजी ०२ जहाल माओवादयांनी पोलीसांसमोर आत्मसर्मपण केले आहे. काल दिनांक ०६/११/२०१७ रोजी झालेल्या पोलीस माओवादी चकमकी दरम्यान ०७ माओवादयांना कंठस्नान घालण्याची बातमी ताजी असतांनाच आज दोन माओवादयांनी केलेल्या आत्मसमर्पणाने माओवादी चळवळीला जबर दणका बसला असुन गडचिरोली पोलीसांच्या एकामागोमाग एक धडक कारवाईने माओवादी चळवळीचे कंबरडे मोडले आहे. गडचिरोली पोलीसांना सलग दुसऱ्या दिवशी मिळालेले हे मोठे यश आहे. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पन योजनेमुळे गडचिरोली जिल्हयातील माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पन करीत आहेत. आतापर्यंत वरिष्ठ माओवादी सदस्यांसह अनेक जहाल माओवादयांनी आत्मसमर्पन केल्याने व पोलीस दलाने त्यांचे पुनर्वसन घडवून आणल्यामुळे नुकतेच प्रत्येकी एकूण रुपये २ लाख बक्षिस असलेल्या दोन जहाल माओवादी यांनी आत्मसमर्पन केले आहे. यामुळे गडचिरोली जिल्हयातील माओवादी चळवळीला जबर धक्का बसला आहे. गडचिरोली पोलीसांनी आतापर्यंत केलेली कामगिरी तसेच जनतेचा संपादन केलेला विश्वास यामुळे माओवादी मोठयाप्रमाणात आत्मसमर्पन करीत आहेत. मा. अपर पोलीस महासंचालक (नक्षलविरोधी अभियान) श्री. डी. कनकरत्नम साो., मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार साो. व मा. पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपुर श्री. अंकुश शिंदे साो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख यांच्या समोर दोन जहाल माओवादयांनी आत्मसमर्पन केले आहे.

१) **<u>कमला रामसु गावळे</u>-** ही कोरची दलममध्ये कार्यरत होती. माहे २०११ ला केकडी दलममध्ये सदस्या पदावर भरती झाली होती. तिचा मौजा फुलगोदी चकमक, मौजा टाहकाटोला येथील

खुण, अशा चकमकीसह गंभीर गुन्हयात सहभाग होता. शासनाने तिचेवर रुपये २ लाख बक्षिस जाहिर केले होते.

२) <u>**नागेश ऊर्फ राजेश मतुरसाय मडावी**</u>- हा २०११ ला दलम पल्लेमाडी छत्तीसगड मध्ये सदस्य पदावर भरती झाला होता. मौजा पल्लेमाडी जंगल परिसरात चकमक, मौजा येरकड-नांदगाव (छ.ग.) रोडवर चकमक, मौजा सितगाव-मुंजाल (छ.ग.) या रोडवर भुसुरुंग स्फोट, मौजा तोळके (छ.ग.) गावातील कोरेटी आडनावाच्या इसमाचा खुण, मौजा जक्के गावातील ग्रामपंचायत मध्ये काळा झेंडा फडकविला, अशा चकमकीसह गंभीर गुन्हयात त्याचा सहभाग होता. शासनाने त्याचेवर २ लाख रुपयाचे बक्षिस जाहिर केले होते.

पोलीस विभागाने आत्मसमर्पन करण्याचे केलेले आवाहन व शासनाची आत्मसमर्पन योजना आणि पोलीस दलाने भुखंड, आर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनिंग यांसारख्या माध्यमातून आत्मसमर्पीतांचे पुनर्वसन घडवून आणल्याने सन २०१७ या चालु वर्षात आतापर्यंत एक कंपनी सदस्य, एक एरिया कमिटी सदस्यासह विविध दलमच्या तब्बल १९ माओवादी सदस्यांनी आत्मसमर्पन करुन माओवादी चळवळीला जबर हादरा दिला आहे. आत्मसमर्पित लोकांच्या आत्मसमर्पणातून प्रेरणा घेवून दलममध्ये कार्यरत इतर सदस्यही नक्कीच आत्मसमर्पण करतील असा विश्वास डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी दर्शविला आहे. यासोबतच पोलीस अधिक्षकांनी दलममध्ये कार्यरत माओवादी सदस्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करुन आत्मसमर्पण योजना अधिक प्रभाविपणे राबवून अधिकाधिक माओवादी सदस्यांचे आत्मसमर्पण घडवून आणण्याचे संकेत दिले आहेत.



